COPY OF ESSENTIALITY CERTIFICATE ISSUED BY THE STATE GOVERNMENT

FOR BDS

*Annexure-VI*

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

No- MED-1300/112/CR- 368/ EDU-1
Medical Education & Drugs Dept.
Mantralaya, Mumbai-32
Date- 29 June, 2001

## ESSENTIALITY CERTIFICATE

This is to certify that there is presently a need to start a new Dental College in the state of Maharashtra. At present there are 15 Dental colleges and have 1040 admission seats in all Dental Colleges in the state of Maharashtra. The total number of registered dentists are 6149 and the ratio of the Dentist to the population of Maharashtra is 1: 12915. At present there are only two dental colleges having only 140 admission capacity in Pune Division. Hence, it is desirable to grant permission to start a new dental college with annual intake capacity of 100 students by Mahatma Gandhi Charitable Medical Trust's Dental College, at Warna Nagar, District Kolhapur in Maharashtra in the said division area.

The Certificate is being given on the condition that the college will fulfill the norms and condition laid down by Dental Council of India, New Delhi and the Maharashtra University of Health Sciences, Nashik and will not employ/engage any teacher from the Government Dental College except their retirement and superannuation.

(Dattatray Borhade)
Section Officer to Government

Essentiality-Dental

Dr. Harish Kulkarni M.D.S.

अति-तात्काळ

महाराष्ट्र शासन

क्र.:बीडीएस-१००५/२३०८/प्र.क्र.२९१/०५/शि-२
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ ऑगस्ट, २००५.

प्रति,
सक्षम प्राधिकारी तथा संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

विषय :- प्राचार्य, तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय व संशोधन केंद्र, नवे पारगाव, जि. कोल्हापूर या संस्थेच्या परवानगीच्या नूतनीकरणाबाबत.

संदर्भ:- १) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.बीडीएस-१००४/३२७४/सीआर-४०४/०४/शिक्षण-२, दि.२१.७.०४
२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे पत्र क्र. व्ही-१२०१७/१४/२००१/(पीएमएस) दि.६.७.२००५

महोदय,

तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय, नवे पारगाव, जि. कोल्हापूर या महाविद्यालयात ६० प्रवेश क्षमतेवर तिसऱ्या तुकडीचे प्रवेश करण्यास संदर्भाधीन अ.क्र.(१) येथील शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. आता केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन क्र. (२) येथील पत्राद्वारे सदर महाविद्यालयास चौथ्या तुकडीच्या बी.डी.एस. अभ्यासक्रमाच्या परवानगीच्या नूतनीकरणास ६० प्रवेश क्षमतेस मान्यता असल्याचे कळविले आहे. केंद्र शासनाने वर उल्लेखित पत्राद्वारे दिलेली मान्यता विचारात घेऊन, त्यांच्या सदर पत्रात नमूद केलेल्या अटीनुसार शासन सन २००५-०६ या वर्षी सदर महाविद्यालयात चौथ्या तुकडीचे ६० एवढे प्रवेश करण्यास मान्यता देत आहे. सदर महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकने दि.६.६.२००५ च्या पत्रान्वये काही अटींच्या अधीन राहून संलग्नीकरणास मान्यता दिलेली आहे. तरी संबंधितांनी सदर महाविद्यालयात सन २००५-०६ वर्षासाठी प्रवेश करण्याची कार्यवाही करावी.

सहपत्र : केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे पत्र क्र. व्ही-१२०१७/१४/२००१/पीएमएस,दि.६.७.२००५.

आपला विश्वासू,
(सु.ना.रणखांबे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्राचार्य, तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय व संशोधन केंद्र, नवे पारगाव, जि. कोल्हापूर.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. ATTESTED

महात्मा गांधी चॅरीटेबल मेडीकल ट्रस्टचे तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय व संशोधन केंद्र, पारगाव जि.कोल्हापूर या संस्थेच्या परवानगीच्या नुतनीकरणाबाबत....

## महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीडीएस १००४/३२७४/सीआर-४०४/०४/शि-२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ जुलै, २००४.

वाचा : १) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.बीडीएस-१३००/२२३४/प्र.क्र.३६८/२०००/शिक्षण-१, दिनांक २ जुलै, २००२.
२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र.बीडीएस-१००३/३३४१/सीआर-४१४/०३/शिक्षण-२, दिनांक २६/८/२००३.
३) केंद्र शासनाचे पत्र क्र. व्ही-१२०१७/१४/२००१-पीएमएस, दि.१६ जुलै, २००४.

**शासन निर्णय :**

शासनाच्या संदर्भाधीन क्र. (१) येथील दि.२ जुलै, २००२ च्या शासन निर्णयाद्वारे महात्मा गांधी चॅरीटेबल मेडीकल ट्रस्ट,वारणानगर, जि.कोल्हापूर या संस्थेस पारगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय सुरु करण्यास सन २००२-२००३ पासून केंद्र शासनाने दिलेली मान्यता विचारात घेऊन परवानगी दिली आहे. संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन निर्णयाद्वारे सदर महाविद्यालयात ६० प्रवेश जागांवर दुसऱ्या तुकडीचे प्रवेश करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. आता केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त संदर्भाधीन क्र.(३) येथील पत्राद्वारे ६० प्रवेश जागांवर तिसऱ्या तुकडीच्या बी.डी.एस.अभ्यासक्रमाच्या परवानगीच्या नुतनीकरणास मान्यता असल्याचे कळविले आहे.

२. केंद्र शासनाने संदर्भांकित क्र.(३) येथील दि.१६ जुलै, २००४ च्या पत्राद्वारे दिलेली मान्यता विचारात घेऊन, त्यांच्या सदर पत्रात नमूद केलेल्या अटीनुसार, शासन सन २००४-०५ या वर्षी सदर महाविद्यालयात ६० एवढे प्रवेश करण्यास मान्यता देत आहे.

३. सदरची मान्यता महाविद्यालयाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या संलग्निकरणाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. तरी संलग्नीकरणानंतर संबंधीतांनी सदर महाविद्यालयात सन २००४-२००५ वर्षासाठी प्रवेश करण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दत्तात्रय बोन्हाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Dr. Harish Kulkarni M.D.S.

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

(120)

महात्मा गांधी चॅरीटेबल मेडीकल ट्रस्टचे तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय व संशोधन केंद्र, पारगाव जि.कोल्हापूर या संस्थेच्या परवानगीच्या नुतनीकरणाबाबत

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय:-बीडीएस-१००३/३३४१/सीआर-४१४/०३/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :२६ ऑगस्ट, २००३.

वाचा : १) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.बीडीएस-१३००/२२३४/प्र.क्र.३६८/२०००/शिक्षण-१ दि.२ जुलै, २००२
२) केंद्र शासनाचे प.क्र.एफक्र.व्ही १२०१७/१४/२००१-पीएमएस, दि.३ जुलै, २००३

शासन निर्णय:- शासनाच्या संदर्भाधीन क्र.(१) येथील दि.२ जुलै, २००२ च्या शासन निर्णयाद्वारे महात्मा गांधी चॅरीटेबल मेडीकल ट्रस्ट वारणानगर, जि.कोल्हापूर या संस्थेस पारगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय सुरु करण्यास सन २००२-२००३ पासून केंद्र शासनाने दिलेली मान्यता विचारात घेवून परवानगी दिली आहे. आता केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त संदर्भाधीन क्र.(२) येथील पत्राद्वारे परवानगीच्या नुतनीकरणास मान्यता असल्याचे कळविले आहे.

२. केंद्र शासनाने संदर्भांकित दि.३ जुलै २००३ च्या पत्राद्वारे दिलेली मान्यता विचारात घेवून सन २००३-०४ या वर्षी सदर महाविद्यालयात ६० एवढे प्रवेश करण्यास शासन मान्यता देत आहे.

३. तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय व संशोधन केंद्र, नवे पारगाव (जि.कोल्हापूर) येथे सन २००३-०४ न्यायालयीन निदेशानुसार अंमलात येणाऱ्या धोरणानुसार प्रवेश करण्याची कार्यवाही संबंधितांकडून करण्यात यावी. महाविद्यालयाने विद्यापीठाकडून संलग्नीकरणाचे नुतनीकरण प्राप्त करण्याची कार्यवाही करावी. प्रवेश करण्याची परवानगी केंद्र शासनाने त्यांच्या पत्रात विहित केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दत्तात्रय बोऱ्हाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

TRUE COPY

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

Alep-let/93
Budget Comp

Dr. Harish Kulkarni M.D.S.
[illegible]
T.K. D. C. [illegible] Centre,
New Pargaon, Tal. Hatkanangle,

मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली. (पत्राद्वारे)
सचिव, भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली (पत्राने)
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (पांच प्रती)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. (पांच प्रती)
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई.
सर्व वैद्यकीय/दंत महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य
अध्यक्ष, महात्मा गांधी चॅरीटेबल मेडिकल ट्रस्ट, वारणानगर, जि.कोल्हापूर.
मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-१)

Mep-let-94
Budeet Comp

महात्मा गांधी चॅरीटेबल मेडिकल ट्रस्ट,
वारणानगर, जि. कोल्हापूर.
नवीन खाजगी दंत महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीडीएस-१२ /२५३५/प्र.क्र.३६८/२०००/शिक्षण-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- २ जुलै, २००२

वाचा:- १ उपाध्यक्ष, महात्मा गांधी चॅरीटेबल मेडिकल ट्रस्ट, वारणानगर, जि. कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक/एमजीएच/सी-११/५६//०००-२००१, दि. १६.५.२०००.

२ शासन पत्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक बीडीएस-१२००/ २५३५/प्र.क्र.३६८/२०००/शिक्षण-१, दि. २० जुन २०००.

३ शासन पत्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक बीडीएस-१२००/ २५३५/प्र.क्र.३६८/२०००/ शिक्षण-१, दि. २९.६.२०००.

४ आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक व्ही.१२०१७/१४ /२००१-पीएमएस, दि. २८ जुलै, २००१

**प्रस्तावना :-** महात्मा गांधी चॅरीटेबल मेडिकल ट्रस्ट, वारणानगर, जि. कोल्हापूर या संस्थेने त्यांच्या संस्थेस खाजगी दंत महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव संदर्भ क्रमांक (१) अन्वये शासनास सादर केला. राज्यात ील दंत अभ्यासक्रमाच्या शिक्षणाच्या उपलब्ध जागांचा विचार करुन त्यामध्ये वाढ होण्याची गरज लक्षात घेऊन सदर संस्थेस वारणानगर, जि. कोल्हापूर येथे नवीन तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय सुरु करण्यास शासनाने वरील संदर्भ क्रमांक (२) व (३) अन्वये "आवश्यकता प्रमाणपत्र" दिले. तसेच संदर्भ क्रमांक (४) अन्वये भारतीय दंत परीषद, नवी दिल्ली यांच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाचे आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी सदर संस्थेस सन २००२-२००३ या शैक्षिणक वर्षात ६० विद्यार्थी प्रवेश करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने मान्यता दिल्यानुसार या संस्थेस सन २००२-२००३ शैक्षणिक वर्षापासून वारणानगर, जि. कोल्हापूर येथे ६० विद्यार्थी क्षमतेचे तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-** केंद्र शासनाने मान्यता दिल्यानुसार शासन याद्वारे महात्मा गांधी चॅरीटेबल मेडिकल ट्रस्ट, वारणानगर, जि. कोल्हापूर या संस्थेस खालील अटीच्या अधिन राहून सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून वारणानगर, जि. कोल्हापूर येथे तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देत आहे:-

TRUE COPY

Dr. Harish Kulkarni M.D.S.
Principal
T. K. D. C. & R. Centre,
New Pargaon

१) या दंत महाविद्यालयाची प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार ६० एवढी राहिल.

२) संस्थेने नविन दंत महाविद्यालयाच्या संलग्निकरणास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची मान्यता मिळवावी.

३) दंत महाविद्यालयातील प्रवेश रिट पिटीशन क्र. ६०२/९२, जे.उन्नीकृष्णन विरुध्द आंध्र प्रदेश या याचिकेत सर्वोच्च न्यायालयाने विहित केलेल्या योजनेनुसार शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत केंद्रीय पध्दतीने करण्यात येतील.

४) भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी दंत अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८ चा ६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही असे लेखी अभिवचन शासनास दिले पाहिजे.

७) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यन्त किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यन्त संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) केंद्र शासनाने दिलेली मान्यता ही १ वर्षाच्या अवधीसाठी असल्याने भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्य रित्या पूर्तता करुन संस्थेने दरवर्षी मान्यतेचे नूतनीकरण करणे आवश्यक राहील. संस्थेने सन २००३-२००४ या वर्षासाठी केंद्र शासनाकडून मान्यतेचे (नुतनीकरणाचे) आदेश प्राप्त करे पर्यंत प्रवेश करण्यात येणार नाहीत.

२. सक्षम प्रधिकारी तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी सदर संस्थेत सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षात प्रवेश करण्याची कार्यवाही विद्यापीठाची सलग्नता मिळाल्यावर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भा.र. गावित)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

सचिव,आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय,, निर्माण भवन, नवी दिल्ली. (पत्राद्वारे)

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ : नोव्हेंबर, २००२.

## अधिसूचना

मुंबई शरीररचनाशास्त्र अधिनियम १९४९

क्रमांक : बीडीएस-२००२/३६४२/ प्र.क्र. ५९२/०२/शिक्षण-२, मुंबई शरीररचनाशास्त्र अधिनियम १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम अकरा) च्या कलम २ पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय व संशोधन केंद्र नवे पारगाव जि. कोल्हापूर या संस्थेस उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोटकलम (१) व (२) आणि (३) च्या प्रयोजनाकरीता मान्यता प्राप्त संस्था म्हणून घोषित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दत्तात्रय शिन्हाडे)
कक्षा अधिकारी

प्रत,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्य मंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (५ प्रती)
प्राचार्य,तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालय व संशोधन केंद्र नवे पारगाव, जि. कोल्हापूर
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय (यांना अशी विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-४ (ब) मध्ये सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी आणि त्याच्या ५० प्रती या विभागाला पाठविण्यात याव्यात.)
जिल्हा पोलीस अधिक्षक, कोल्हापूर
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर
जिल्हा शल्यचिकित्सक, [illegible] रुग्णालय, कोल्हापूर
आरोग्य अधिकारी महानगर पालिका, कोल्हापूर
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,कोल्हापूर
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
अवर सचिव (अधिनियम), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

GOVERNMENT OF MAHARASHTRA

MEDICAL EDUCATION & DRUGS
DEPARTMENT, MANTRALAYA,
MUMBAI 400 032.
Dated : 7th November 2001.

NOTIFICATION.

Bombay Anatomy Act 1949

No.BDS-2002/3642/CR-592/2001/EDU-2.- In exercise of the powers conferred by sub-section (I) of section 2 of the Bombay Anatomy Act, 1949 (Bom.XI of 1949) the Government of Maharashtra hereby declares that the Tatyasaheb Kore Dental College, New Pargaon, Dist. Kolhapur, as an approved institution for the purposes of sub-section (1), (2) & (3) of Section 5 of the Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(D. B. Borhade )
Section Officer

To,
The Secretary to Governor of Maharashtra, Rajbhavan, Mumbai,
The Secretary to the Hon.Chief Minister, Mantralaya, Mumbai,
The Director of Medical Education & Research , Maharashtra State , Mumbai
The Registrar, Maharashtra University of Health Sciences, Nashik,
The Principal, Tatyasaheb Kore Dental College, New Pargaon, Dist. Kolhapur.
The Manager, Government Central Press, Mumbai
(with request to publish the Notification in IV(B) of the Maharashtra Government Gazette and to supply 50 copies of the Notification to the Dept. ...
The Superintendent of Police, Kolhapur
The Dy.Regional Transport Officer, Kolhapur ,
The Registrar, Coronor's Court,
J.J. Hospital Compound, Mumbai 400 008,
The Additional Coroner, Rajawadi Hospital ,Ghatkopar, Mumbai,
The Additional Coroner, Cooper Hospital , Juhu, Mumbai,
The District Civil Surgeon, General Hospital, Kolhapur
The Sarpanch, Grampanchayat, New Pargaon, Dist Kolhapur ,
The District Health officer, Zilla Parishad, Kolhapur ,
The Personal Secretary to Minister (MED),
Act Section, MEDD , Mantralaya, Mumbai
Select File (EDU-2)

Tar noti (15)